C653

# महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.

दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी देशपांडे सभागृह, नागपूर येथे सकाळी ११:०० वाजता महामंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक च्या संपन्न झालेल्या सन २०१७-१८ च्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सभेस खालील प्रमाणे सन्माननिय संचालक उपस्थित होते.

| अ.क्र. | संचालक सदस्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.ना.श्री विष्णुजी सवरा<br>मंत्री,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा<br>अध्यक्ष,आ.वि.म.मर्या., नाशिक | अध्यक्ष. |
| २. | मा.ना.श्री राजेअम्ब्रीशराव आत्राम<br>राज्यमंत्री, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य तथा उपाध्यक्ष,<br>आ.वि.म.मर्या., नाशिक | उपाध्यक्ष. |
| ३. | मा.अॅड.श्री. देविदास पाटील. | संचालक |
| ४. | मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा. | संचालक |
| ५. | मा.श्री. धनराज हरिभाऊ महाले. | संचालक |
| ६. | मा.श्री.विकास दुलाजी वळवी. | संचालक |
| ७. | मा.श्री. मधुकर निंबाजी काठे. | संचालक |
| ८. | मा.श्री. विठ्ठल देवराम देशमुख. | संचालक |
| ९. | मा.श्री. केवलरात तुळशीराम काळे. | संचालक |
| १०. | मा.श्री. मगन नुरा वळवी. | संचालक |
| ११. | मा.श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग. | संचालक |
| १२. | मा.श्री. प्रकाश तुळशिराम दडमल. | संचालक |
| १३. | मा.श्रीमती जयश्री नामदेव तळपे. | संचालिका |
| १४. | मा.श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी. | संचालिका |
| १५. | मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग<br>महाराष्ट्र राज्य, नाशिक, प्रतिनिधी | संचालक |
| १६. | मा.श्री.दिलीप गावडे,<br>अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक | संचालक |
| १७. | मा.अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे<br>श्री देशमुख (AFO) प्रतिनिधी | संचालक |
| १८. | मा.अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर<br>श्री चव्हाण, प्रतिनिधी. | संचालक |
| १९. | मा. सहनिंबधक, सहकारी संस्था<br>आदिवासी विकास, नाशिक | संचालक |
| २०. | मा.श्री दिलीप गावडे, भा.प्र.से<br>व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास<br>महामंडळ मर्यादित, नाशिक | सदस्य सचिव |

त्याचप्रमाणे सभेस खालील प्रमाणे आदिवासी विविध कार्यकारी सहकारी, संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.



Scanned with CamScanner

...ये दिनांक २० ...

उपस्थित संस्था प्रतिनिधी.

| अ.क्र. | संस्था प्रतिनिधीचे नांव | संस्थेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| | **१) प्रादेशिक कार्यालय, जव्हार.** | | | |
| १. | श्री नंदकुमार वामन डामसे | दुधनोली | मुरबाड | ठाणे |
| २. | श्री विष्णु लक्ष्मण मोडक | खांडस | कर्जत | रायगड |
| ३. | श्री बबन चिंधु भालेराव | वारे | कर्जत | रायगड |
| ४. | श्री अशोक परशुराम भुसाल | नांदगाव | कर्जत | रायगड |
| | **२) प्रादेशिक कार्यालय, नाशिक.** | | | |
| ५. | श्री महादु काळू पवार | देवडोंगरा | त्र्यंबकेश्वर | नाशिक |
| ६. | श्री नारायण मुला खिरारी | कोटंबी | त्र्यंबकेश्वर | नाशिक |
| ७. | श्री रामकृष्ण भावराव जाधव | विसापुर | कळवण | नाशिक |
| | **३) प्रादेशिक कार्यालय, जुन्नर.** | | | |
| ८. | श्री गणपत तुकाराम बोकड | पिंपळगांव जोगा | जुन्नर | पुणे |
| ९. | श्री जयराम गोविंद दुदे | रतनवाडी | अकोले | अहमदनगर |
| | **४) प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार.** | | | |
| १०. | श्री दिपचंद राजाराम कोकणी | ब्राम्हणवेल | साक्री | धुळे |
| ११. | श्री सोनु मंगा सुर्यवंशी | जांभोरे | साक्री | धुळे |
| | **५) प्रादेशिक कार्यालय, धारणी.** | | | |
| १२. | श्री रविंद्र कन्हैलाल नवलाखे | टिटंबा | धारणी | अमरावती |
| १३. | श्री केन्डे मानु कास्तेकर | दुणी | धारणी | अमरावती |
| १४. | श्री रमेश महादेवसा जिराफे | हरीसाल | धारणी | अमरावती |
| १५. | श्री बिरसा छोटू सलामे | बैरागड | धारणी | अमरावती |
| | **६) प्रादेशिक कार्यालय, भंडारा** | | | |
| १६. | श्री रमनलाल मोहनलाल आत्राम | लोहारा | सालेकसा | गोंदिया |
| १७. | श्री रामेश्वर रतनजी नरेशी | बोरगांव | देवरी | गोंदिया |
| १८. | श्री मेहतरलाल धानु कोराम | डवकी | देवरी | गोंदिया |
| १९. | श्री सुरेश दलिराम निकाडे | चिंचेवाळा | देवरी | गोंदिया |
| २०. | श्री रमेश गजु ईळपाते | डोंगरगाव | देवरी | गोंदिया |
| २१. | श्री रमेश नारायण ताराम | मरानजोळ | देवरी | गोंदिया |
| २२. | श्री फगनुजी दर्जी कयलो | कडीकसा | देवरी | गोंदिया |
| २३. | श्री राम नारायण सुनागर | ककोडी | देवरी | गोंदिया |
| २४. | श्री सुनिल मोतीराम कुंभरे | आलेवाडा | देवरी | गोंदिया |
| २५. | श्री संताराम केजाऊ भोयर | चिंचगड | देवरी | गोंदिया |
| २६. | श्री प्रल्हाद प्रमसिंग दुधनाग | आंभोरा | देवरी | गोंदिया |
| २७. | श्री देवराम भिवा मरसकोल्हे | कोहमारा | देवरी | गोंदिया |
| २८. | श्री आनंदराव कवडू जोशी | डव्वा | देवरी | गोंदिया |
| २९. | श्री हरिचंद्र पांडूरंग कोल्हे | परसोडी | देवरी | गोंदिया |
| ३०. | श्री ईश्वरदास जगन्नाथ लांजे | खजरी | देवरी | गोंदिया |
| ३१. | श्री धनलाल सितल करपाल | दल्ही | देवरी | गोंदिया |
| ३२. | श्री रुपलाल मंगरु पंधरे | देवरी | देवरी | गोंदिया |
| ३३. | श्री चेतनसिंह नवलकिशोर नागभिरे | मजीतपुर | गोंदिया | गोंदिया |
| ३४. | श्री मुलचंद हरिचंद गावराने | सालेकसा | सालेकसा | गोंदिया |



Batik,

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५. | श्री शंकरलाल गुणेजी मडावी | दरेकसा | सालेकसा | गोंदिया |
| ३६. | श्री संतोश छगनलाल मडावी | गोरे | सालेकसा | गोंदिया |
| ३७. | श्री शामलाल पुनारामजी उईके | सावली | सालेकसा | गोंदिया |
| ३८. | श्री हिरालाल पांडुरंगजी उईके | सातगांव | सालेकसा | गोंदिया |
| ३९. | श्री काशिराम बाजीराव कुटे | कोटरा | सालेकसा | गोंदिया |
| ४०. | श्री पी. एस. भोयर | पिपरीया | सालेकसा | गोंदिया |
| ४१. | श्री बुधराम केशवजी डुंमरे | लोहारा | देवरी | गोंदिया |
| ४२. | श्री सखाराम डोमा तुमसरे | मंगेझरी | तिरोडा | गोंदिया |
| ४३. | श्री बळीराम विठ्ठल धुर्वे | सोनेखरी | तिरोडा | गोंदिया |
| ४४. | श्री जागेशवर मातीरामी घणभते | कनेरी | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ४५. | श्री सुदाम उसनजी गुरमुले | पवनी | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ४६. | श्री ग्यानीराम परसराम गावड | पालांदुर | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ४७. | श्री सुदाम नारायण कोवे | ईळदा | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ४८. | श्री तुलाराम शाहु मारगाये | बारभाटी | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ४९. | श्री गोपीनाथ मारोती दखडे | गोटणगांव | अर्जुनी मोरगांव | गोंदिया |
| ५०. | श्री पंचम फागो कोवाचे | हिरवे बाजार | रामटेक | भंडारा |
| ५१. | श्री राधेश्याम बुरश्या उईके | पवनी | रामटेक | भंडारा |
| ५२. | श्री सुकदेवराम सदाशिवराव धुर्वे | बागडापुर | कारंजा | वर्धा |
| ५३. | श्री मालिकचंद गोविंदरावजी आचले | पुराडा | देवरी | गोंदिया |
| **७) प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर.** | | | | |
| ५४. | श्री दशरथ चिधुजी नन्नावरे | डोमा | चिमुर | चंद्रपुर |
| ५५. | श्री महादेव दाजीबाजी दोडके | मोटेगांव | चिमुर | चंद्रपुर |
| ५६. | श्री बळीराम नथुजी गरमडे | आंबेनेरी | चिमुर | चंद्रपुर |
| ५७. | श्री नथु काशिराम वाघे | खांबाडा | चिमुर | चंद्रपुर |
| ५८. | श्री नरेश नामदेव शेंडे | जांभुळघाट | चिमुर | चंद्रपुर |
| ५९. | श्री पुंडलिक तुळशीराम नन्नावरे | चिंधीचेक | चिमुर | चंद्रपुर |
| ६०. | श्री रामदास विठोबा आत्राम | हरदोना खुर्द | राजुरा | चंद्रपुर |
| ६१. | श्री मुकेश दामोवरजी वाढवे | मोहाली (गो) | नागभीड | चंद्रपुर |
| ६२. | श्री वसंत शाहुजी काटेखाचे | गोविंदपुर | नागभीड | चंद्रपुर |
| ६३. | श्री शांताराम दादाजी मडावी | बाळापुर | नागभीड | चंद्रपुर |
| ६४. | श्री संजय विठ्ठलराव घोनमोडे | वाढोणा | नागभीड | चंद्रपुर |
| ६५. | श्री मुकुंदाजी देविदास टेंभुर्णे | जीवनापुर | नागभीड | चंद्रपुर |
| ६६. | श्री शिवशंकर कृष्णाकुमार सहारे | सावरगांव | नागभीड | चंद्रपुर |
| ६७. | श्री अरविंद दादाजी मेश्राम | खंबाडा | वरोरा | चंद्रपुर |
| ६८. | श्री देविदास सहदेव निवतोडे | गुंजाळा | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ६९. | श्री रामरतन महादु सोडमाके | तांबेकडीमेंढा | शिंदेवाही | चंद्रपुर |
| **८) उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी (उच्च श्रेणी)** | | | | |
| ७०. | श्री नानाजी सन्याशी चेरमा | देचलीपेठा | अहेरी | गडचिरोली |
| ७१. | श्री लक्ष्मण बकच्या कोडासे | कमलापुर | अहेरी | गडचिरोली |
| ७२. | श्री लक्ष्मण नंदाजी अजमेर | जिमलगट्टा | अहेरी | गडचिरोली |
| ७४. | श्री शामराव जोगा कावडे | उमानुर | अहेरी | गडचिरोली |
| ७५. | श्री वसंत नागन्ना कुरेवार | मन्नेराजाराम | अहेरी | गडचिरोली |
| ७६. | श्री सब्बरबेग सनवरबेग मोगल | भामरागड | ऐटापल्ली | गडचिरोली |
| ७७. | श्री सुनिल शिवराम गेडाम | घोटसुर | ऐटापल्ली | गडचिरोली |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७८. | श्री स्वप्निल देवीदास कन्नालदार | हालेवार | एटापल्ली | गडचिरोली |
| ७९. | श्री नागेश डोलु गावडे | तोडसा | एटापल्ली | गडचिरोली |
| ८०. | श्री प्रशांत गजानन तेल्लुंरवार | गट्टा | एटापल्ली | गडचिरोली |
| ८१. | श्री रुषी पंडरु गोमाडी | कसनसुर | एटापल्ली | गडचिरोली |
| | **९) प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली.** | | | |
| ८२. | श्री रामलाल येशा हलामी | पुराडा | कुरखेडा | गडचिरोली |
| ८३. | श्री राजाराम कशिराम तुलावी | पलसगड | कुरखेडा | गडचिरोली |
| ८४. | श्री जीवनपाशील केवलरामजी नार | खेडेगांव | कुरखेडा | गडचिरोली |
| ८५. | श्री वासुदेव तुळशीराम दुगा | रामगड | कुरखेडा | गडचिरोली |
| ८६. | श्री सुभाष तानु गुंभरे | मालेवाडा | कुरखेडा | गडचिरोली |
| ८७. | श्री शिवनाथ नथु दडमल | उराडी | कुरखेडा | गडचिरोली |
| ८८. | श्री योगेश तुलाराम गायकवाड | गेवर्धा | कुरखेडा | गडचिरोली |
| ८९. | श्री पंढरी योगाजी राजगाय | देऊळगांव | कुरखेडा | गडचिरोली |
| ९०. | श्री माधव नारायणजी तलमुले | वडेगांव | कुरखेडा | गडचिरोली |
| ९१. | श्री बाबुराव वासुदेव तुलावी | कुरखेडा | कुरखेडा | गडचिरोली |
| ९२. | श्री उध्वराम लक्ष्मण गहाणे | घाटी | कुरखेडा | गडचिरोली |
| ९३. | श्री ऋषी जानकाजी बोरकर | कढोली | कुरखेडा | गडचिरोली |
| ९४. | श्री जीवन दामा मेश्राम | गोठणगांव | कुरखेडा | गडचिरोली |
| ९५. | श्री सुभाष तानबा बोरकार | सोनसरी | कुरखेडा | गडचिरोली |
| ९६. | श्री हेमंत केवलराम सेंदरे | आंधळी | कुरखेडा | गडचिरोली |
| ९७. | श्री शामलाल पांडुजी मडावी | कोरची | कोरची | गडचिरोली |
| ९८. | श्री हकीमउद्दीन नवाबउद्दीन शेख | बेतकाठी | कोरची | गडचिरोली |
| ९९. | श्री बंडुजी तिमाजी किरंगे | सोंडे | धानोरा | गडचिरोली |
| १००. | श्री गजानन डोमाजी बावणे | दुधमाळ | धानोरा | गडचिरोली |
| १०१. | श्री ऋषी बळीराम मशाखेगी | धानोरा | धानोरा | गडचिरोली |
| १०२. | श्री माणिक जीवन नाकाडे | अंगारा | धानोरा | गडचिरोली |
| १०३. | श्री इ.गो.कुंभरे | सुरसुंडी | धानोरा | गडचिरोली |
| १०४. | श्री बारीकराव रानुजी पदा | देलनवाडी | आरमोरी | गडचिरोली |
| १०५. | श्री बाळाजी धारु कोल्हे | विहिरगांव | आरमोरी | गडचिरोली |
| १०६. | श्री कृष्णा आत्माराम भोयर | पिंपळगांव | आरमोरी | गडचिरोली |
| १०७. | श्री आर.ए.सुर्यवंशी | मौशीखांब | आरमोरी | गडचिरोली |
| १०८. | श्री बमुजी केवलराम ताडाम | दंवडी | आरमोरी | गडचिरोली |
| १०९. | श्री अनिल वारलुजी गुरमुले | बोटी | चामोर्शी | गडचिरोली |
| ११०. | श्री कुळीराम बुधा भुडमेथे | लगाम | चामोर्शी | गडचिरोली |
| १११. | श्री अमोल विठोबा मारगोनवार | गिलगांव | चामोर्शी | गडचिरोली |
| ११२. | श्री भाऊजी रामा नेवारे | रेगडी | चामोर्शी | गडचिरोली |
| ११३. | श्री शामराव सोनु पुगारी | मकेपल्ली | चामोर्शी | गडचिरोली |
| ११४. | श्री रामजी ऋषी नरोटे | आमगांव | चामोर्शी | गडचिरोली |
| ११५. | श्री सोमजी लालु कुलेशी | भाडभिडी | चामोर्शी | गडचिरोली |
| ११६. | श्री बाळा संभा कुळसंगे | घोट | चामोर्शी | गडचिरोली |
| ११७. | श्री नानाजी महादेव कुडमेथे | जामगिरी | चामोर्शी | गडचिरोली |
| ११८. | श्री म.घु.बामणकर | मार्कंडा | चामोर्शी | गडचिरोली |
| ११९. | श्री देवराम ऋषी सिडाम | गुंडापल्ली | चामोर्शी | गडचिरोली |

Scanned with CamScanner

सभेची वेळ व गणपुर्ती झाल्याने व उपस्थित सन्माननिय संचालक आणि संस्थांचे प्रतिनिधी सभागृहात स्थानापन्न झाल्यानंतर ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सुरुवात करण्यापुर्वी अहवाल वर्षात जे आदरणीय नेते, समाजसेवक, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यीक व कवी तसेच महामंडळाचे सेवकवृंद, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाचे सभासद दिवंगत झाले आहेत, तसेच देशहितासाठी शहिद झालेले सैनिक यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन आमसभेत कृतज्ञतापुर्वक श्रध्दाजली अर्पण करण्यात आली.

तद्नंतर ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेले मा.अध्यक्ष तथा मंत्री, आदिवासी विकास (महाराष्ट्र राज्य), मा.संचालक सदस्य, सर्व संस्था प्रतिनिधी तसेच उपस्थित सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी यांचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देवून स्वागत करण्यात आले.

सभेचे प्रस्ताविक करतांना व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यवरांच्या सर्व उपस्थितांचे पुनःश्च स्वागत केले. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने अहवाल वर्ष सन २०१६-१७ मध्ये महामंडळाने राबविलेल्या विविध योजनांचा संक्षिप्त अहवाल जमलेल्या सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिला.

**१) एकाधिकार खरेदी योजना**

अहवाल वर्षात राज्य शासनाने दिनांक १९.१०.२०१३ च्या अधिसुचनेद्वारे २९ तालुक्यांत एकाधिकार खरेदी सुरु करण्यात मंजुरी दिलेली असुन, त्यानुसार शेतकऱ्यांना प्रचलित बाजारभावच्या आधारे सुयोग्य किंमत मिळवून देण्यात आलेली आहे. महामंडळाने एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत २९ तालुक्यांत १६८ खरेदी केंद्र सुरु करुन अन्नधान्य व तेलबिया वजन १७९००.८६ क्विंटल एकुण किंमत रुपये ४०२.९२ लक्ष इतक्या निर्देशित कृर्षीउपज वस्तुंची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच ऐच्छिक गौणवनोपज खरेदी अंतर्गत वजन २५.९० क्विंटल एकुण किंमत रुपये १.९८ लक्ष हिरडा खरेदी करण्यात आलेली आहे.

**२) आधारभुत खरेदी योजना**

महामंडळाने अहवाल वर्षात शासनाने निर्देशित केलेल्या कालावधीत भरडधान्य ज्वारी, मका व बाजरी तसेच धान या मालाची निश्चित केलेल्या आधारभुत किंमतीने ११,७८,८०७.५२ क्विंटल मालाची खरेदी केलेली असुन, खरेदी मालाची किंमत रक्कम रुपये २०,६४३.६४ लक्ष इतकी आहे. सन २०१७-१८ मध्ये सर्व कास्तकारांना सदरची रक्कम त्यांचे बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

**३) सामान्य योजना**

सामान्य योजनेअंतर्गत द्वारवितरण योजना, शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहास अन्नधान्य पुरवठा तसेच आदिवासी लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान तत्वावर तेलपंप वाटप इत्यादी योजना राबविण्यात आल्या आहेत. महामंडळाने सन १९८०-८१ ते २०१३-१४ या आर्थीक वर्षाचे ६१७८४ विजपंप व १०८०१५ तेलपंप आदिवासी शेतकऱ्यांचे शेतामध्ये बसवून देण्यात आलेले आहेत. दिनांक ०५/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार विविध कल्याणकारी योजनामध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणे बाबत निर्णय झाला आहे. यामध्ये महामंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या वस्तू जसे तेलपंप, विजपंप व HDPE पाईपचा समावेश आहे.



Scanned with CamScanner

व्दार वितरण योजनेअंतर्गत अहवाल वर्षात ११ शासकीय व ३१ महामंडळाचे वाहनाव्दारे आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत ५,०३,४३०.१४ क्विंटल मालाची वाहतुक तहसिल गोदामामधुन गावातील स्वस्त धान्य दुकानापर्यंत करण्यात आलेली आहे. तसेच यावर्षी महामंडळामार्फत ३३ स्वताचे मालकीची वाहने कार्यक्षेत्रात उपलब्ध करुन दिली आहेत.

४) **किमान आधारभुत किंमत गौणवनोपज खरेदी योजना**

केंद्र शासनाने किमान आधारभुत किंमतीवर ११ गौणवनोपज खरेदी करण्यास महामंडळास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये केंद्रशासनाने निश्चीत केलेल्या दराने महामंडळ खरेदी करणार आहे. उदा. जंगल मध, डिंक कराया, चिंच, करंज बी, मोहा बी, चारोळी टरफलासहीत, हिरडा, लाख रंगिनी/कुसुमी,सालपान, साल बी इत्यादी.

महामंडळाने आर्थिक वर्षात खालील प्रमाणे गौणवनोपज मालाची खरेदी / विक्री केली आहे.

| अ.क्र. | गौणवनउपजचे नांव | खरेदी | | विक्री | | शिल्लक साटा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वजन क्विं. | किंमत रु. | वजन क्विं. | किंमत रु. | वजन क्वि. | किंमत रु. |
| १. | चिंच बी सहित | ०.८८ | १५८४.०० | ०.२० | ५००.०० | ०.६० | १०८०.०० |
| २. | डिंक कराया | १३.५४ | १४६२३२.०० | -- | -- | १३.४८ | १४५५३०.०० |
| ३. | बरंज बी | २७.६२ | ४९७१६.०० | ०.०९ | २२५.०० | २७.४२ | ४९३५६.०० |
| ४. | मोहा बी | ४३.९९ | ८७९८०.०० | -- | -- | ४२.३३ | ८४६६०.०० |
| ५. | हिरडा | ६९७.६८ | ५५८१४४.०० | ५१५.१७ | १११७८४०.०० | १५६.९३ | १२५५८४.०० |
| ६. | कुसूम बी | ०.३९ | ३९०.०० | -- | -- | ०.२९ | २९०.०० |
| ७. | पोबाड बी | ०.४० | ३२०.०० | -- | -- | ०.३६ | २८८.०० |
| ८. | बेहडा | १८१७.६५ | २७२६४७५.०० | -- | -- | १७२९.५७ | २५९४३४७.५० |
| ९. | बेल (वाळलेला व कवच नसलेला) | १.६८ | २५२०.०० | -- | -- | ०.९३ | १३९५.०० |
| १०. | पळस केसुडा फुल | ०.९४ | ७५२.०० | -- | -- | ०.८३ | ६६४.०० |
| ११. | चारोळी (टरफला सहित) | १.५६ | १४५०८.०० | -- | -- | १.५६ | १४५०८.०० |
| | एकुण | २६०६.३३ | ३५८८६२१.०० | ५१५.४६ | १११८५६५.०० | १९७४.२९ | ३०१७६६२.५० |

अहवाल वर्षामध्ये विविध योजना राबवितांना आर्थिक काटकसरीने धोरण व व्यावसायीक दृष्टीकोन ठेवल्यामुळे रक्कम रुपये ३.५१ कोटी इतका निव्वळ नफा महामंडळास झालेला आहे.

व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रास्तविक केल्यानंतर मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयानुसार सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

Scanned with CamScanner

C648

**विषय क्रमांक १ : वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१७ चे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१७ रोजीचे इतिवृत्त हे सभेस वाचुन दाखविले. वार्षिक सर्वसाधारण सभेने वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१७ रोजीच्या ठरावास मान्यता दिली आणि खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक १ :** वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१७ रोजीचे इतिवृत्तास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा हि मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :** मा.श्री. रमेश नारायण ताराम
**अनुमोदक :** मा.श्री. भास्कर मोतीराम कोसरे.
**ठराव बहुमताने मंजुर**

श्री.प्रतिक चौधरी, उपव्यवस्थापक  श्री.गणेश जाधव, कनिष्ट सहाय्यक

व्यवस्थापक (प्रशासन)

(आदिनाथ दगडे)
महाव्यवस्थापक (प्रशासन),
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
नाशिक

Scanned with CamScanner

C647

**विषय क्र.०२ : सन २०१७-१८ चे दि.३१/०३/२०१८ अखेरचे वार्षिक हिशोबपत्रके, व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद व वार्षिक अहवालास मंजुरी मिळणे बाबत.**

महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०१७-१८ ( दिनांक ०१.०४.२०१७ ते ३१.०३.२०१८ ) या कालावधीचा आर्थिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

महामंडळ राबवित असलेल्या उपक्रमाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे हिशोबपत्रके तयार करुन ती स्वतंत्र सहा भागात दर्शविण्यात आलेली आहे.

१. एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेची एकत्रित परिणाम
२.आधारभूत किंमत खरेदी योजना
३. गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन)
४. किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)
५. खावटी कर्ज वाटप योजना
६. न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना

खावटी कर्ज वाटप व न्युक्लियस बजेट योजना शासन समप्रवर्तक निधीवर आधारीत असल्यामुळे सदर दोन्ही योजनांची आर्थिक हिशोबपत्रके स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

तथापी आधारभूत किंमत खरेदी योजना राज्य शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अभिकर्ता म्हणून महामंडळामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेतील खरेदी केलेल्या मालाचे हस्तांतरण शासनाचे निर्देशाप्रमाणे होत असल्यामुळे व त्यावर मिळणारा तात्पुरता स्वरुपात अनुषंगिक खर्चही (Incidential Charges) शासनाकडून निश्चित केलेल्या दराने अभिकर्त्यास दिला जातो त्यामुळे आधारभूत किंमत खरेदी योजनेचे लेखे वार्षिक अहवालात स्वतंत्र दर्शविण्यास आलेले आहेत.

तसेच गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन) या योजनेत तोटा आल्यास ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती होणार असल्यामुळे या योजनेचे हिशोबपत्रके स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

खरिप पणन हंगाम मध्ये केंद्र शासनाच्या किंमत स्थिर योजने अंतर्गत नाफेड मार्फत हमी दराने अभिकर्ता म्हणुन महामंडळा मार्फत तुर खरेदी करण्यात आली असल्याने व नाफेड कडुन याची प्रतीपुर्ती होणार असल्याने या योजनेचे हिशोबपत्रके सुधा स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

**योजनानिहाय तरतूदीपूर्वी झालेला व्यापारी व निव्वळ नफा खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | उपक्रमाचे नाव | व्यापारी नफा | निव्वळ नफा |
|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना | ३९,०८,७६३.४९ | २४,५९,८०,५२२.४७ |
| | सामान्य योजना | २२,५९,८५६,६१ | ५४,१२,९६३.६४ |
| | **एकूण अ** | **६१,६८,६२०.१०** | **२५,१३,९३,४८६.११** |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | २२,५६,९४४.०७ | ७०,२४,६४९.३९ |
| | **एकूण ब** | **२२,५६,९४४.०७** | ७०,२४,६४९.३९ |
| ३ | **केंद्र शासन गौणवनोपज किमान आधारभुत किंमत खरेदी योजना.** | **३,९०,२३२.९०** | **३,८९,४४८.२०** |
| ४ | **किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)** | **१६,०५,५९४.००** | **१६,०४,१०२.१५** |



Scanned with CamScanner

क्रमांक ...

१) एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

आर्थिक वर्ष २०१७-१८ अखेर तरतूदी करणेचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यास मान्यता मिळावी.

| अ.क्र | योजना | तपशिल | निव्वळ नफयातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित झालेल्या नफयातून मुख्य कार्यालय एकाधिकार खरेदी योजनेच्या लेख्यांमध्ये घ्यावयाची तरतूद | रिझर्व्ह फंड खाते (राखीव निधी) २५% | ६,२८,४८,०००.०० |
| | | भागभांडवल विमोचन निधी | ६,३०,७२,०००.०० |
| | | इमारत निधी १०% | २,५१,३९,०००.०० |
| | | वस्तू विकास निधी २०% | ५,०२,७८,०००.०० |
| | | संशयित व बुडीत कर्ज निधी | २०,००,०००.०० |
| | | कर्ज निवारण निधी | २०,००,०००.०० |
| | | व्यापारी चढ उतार निधी | १०,००,०००.०० |
| | | आय.टी.इन्फ्रास्ट्रक्चर निधी | १,००,००,०००.०० |
| | **एकूण तरतूदीची रक्कम** | | **२१,६३,३७,०००.००** |

वरीलप्रमाणे एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित केलेल्या तरतूदीस मान्यतेनंतर शिल्लक निव्वळ नफा रु.३,५०,५६,४८६.११ (अक्षरी रु. तीन कोटी पन्नास लाख छपन्न हजार चारशे शहाऐंशी रुपये व अकरा पैसे मात्र) येतो.

२) आधारभूत किंमत खरेदी योजनेत (PSS) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ७०,००,०००.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **७०,००,०००.००** |

३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत (MSP MFP) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ३,८०,०००.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **३,८०,०००.००** |

४) किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) खरेदी योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | १५,००,०००.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **१५,००,०००.००** |

C645

उपरोक्तप्रमाणे सन २०१७-१८ चे हिशोबपत्रकात प्रस्तावित तरतूदी घेण्यास मान्यता मिळावी. वरीलप्रमाणे तरतूदीनंतर शिल्लक नफा खालीलप्रमाणे :

| अ.क्र | योजना | शिल्लक नफा |
|---|---|---|
| १ | एकाधिकार गौणवनोपज व सामान्य योजना | ३,५०,५६,४८६.११ |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | २४,६४९.३९ |
| ३ | किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत (MSP MFP) | ९,४४८.२० |
| ४ | किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) | १,०४,१०२.१५ |

योजनानिहाय व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०१८ अखेरचे ताळेबंद पत्रक ४५ व्या वार्षिक अहवालात समाविष्ट आहे.

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेच्या एकत्रित व्यापारी व नफा तोटा पत्रकानुसार गोषवारा खालीलप्रमाणे :- (रु.कोटीत)

| आरंभीसाठा, खरेदी खर्च व नफा | रक्कम | विक्री शिल्लकसाठा व उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीसाठा | ३८.२७ | विक्री | २८.४५ |
| खरेदी | १०.३९ | इतर उत्पन्न | ३०.९३ |
| व्यापारी खर्च | ४.२३ | व्यवस्थापकीय अनुदान | ३३.६० |
| व्यवस्थापकीय खर्च | ३६.२२ | शिल्लकसाठा | २२.९७ |
| घसारा (नियमीत) | १.७१ | | |
| तरतूदीपूर्वी नफा | २५.१३ | | |
| **एकूण** | **११५.९५** | **एकूण** | ११५.९५ |
| तरतूदी | २१.६३ | | |
| निव्वळ नफा | ३.५० | | |
| **एकूण** | **२५.१३** | | |

५) खावटी कर्ज वाटप योजना व न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजनेचा समवर्तक निधी व कर्ज येणे तपशिल खालीलप्रमाणे :

(रु.कोटीत)

| अ.क्र | योजना | समवर्तक निधी | कर्ज येणे |
|---|---|---|---|
| १ | खावटी कर्ज योजना | २२८.७५ | २४४.५६ |
| २ | न्युक्लियस बजेट योजना | २.०९ | ४.४८ |

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेचे एकत्रित हिशोबपत्रकानुसार महामंडळास आर्थिक वर्षात निव्वळ नफा रु.२५.१४ कोटी झालेला आहे. त्यामधून रु.२१.६३ कोटीच्या तरतूदी केल्यानंतर शिल्लक नफा रु.३.५१ कोटी आहे.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०१७-१८ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०१८ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी.



Scanned with CamScanner

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.०२** :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, आर्थिक वर्ष सन २०१७-१८ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दि.३१/०३/२०१८ अखेरचे ताळेबंद याची सदर सभा नोंद घेत असुन त्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. रमेश नारायण ताराम

**अनुमोदक** :- मा.श्री. मंगेश मारुती गागंड.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.०३ : सन २०१८-१९ या वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पित निधी व सन २०१९-२० च्या वार्षिक अंदाज**

पत्रकास मान्यता देणे बाबत.

केंद्र व राज्य शासनाकडुन महामंडळास भागभांडवल,अनूदान व अर्थसहाय्य प्राप्त होते. आर्थिक वर्ष २०१७-२०१८ व २०१८-२०१९ मधील लेखाशिर्षनिहाय योजनेतंर्गत व योजनेत्तर मागणी अर्थसंकल्पित व प्रत्यक्ष प्राप्तचा तपशिलानुसार आर्थिक वर्ष २०१९-२०२० मधील मागणिचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे. (रु.लाखात)

| लेखाशिर्षक | वर्ष २०१७-२०१८ | | | वर्ष २०१८-२०१९ | | | २०१[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मागणी** | **अर्थसंकल्पित** | **प्रत्यक्ष** | **मागणी** | **अर्थसंकल्पित** | **प्रत्यक्ष** | अंदा[illegible] |
| **राज्य शासन :** | | | | | | | |
| भागभांडवल **(4425 0472)** | 7500.00 | 300.00 | 0.00 | 2500.00 | 200.00 | 0.00 | 7000.[illegible] |
| सहाय्यक अनुदान **(2425 0853)** | 50.00 | 50.00 | 15.61 | 30.00 | 20.00 | 0.00 | 17.50 |
| खावटी कर्ज **(2425 1493)** | 6000.00 | 0.01 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज (MSP) २५% **(2425 2426)** | 50.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 44.6[illegible] |
| **एकूण** | **13600.00** | **350.01** | **15.61** | **2530.00** | **220.00** | **0.00** | 7062.1[illegible] |
| **केंद्रशासन :** | | | | | | | |
| गौणवनोपज (वि.कें.अ.) **(2425 0862)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज (MSP) ७५% **(2425 2426)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **एकूण :** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | 0.00 |
| **एकूणांत:** | **13600.00** | **350.01** | **15.61** | **2530.00** | **220.00** | **0.00** | 706[illegible] |
| राज्य शासन : | | | | | | | |



AMM

C643

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवस्थापकीय अनुदान (2425 0853) | 5206.61 | 4250.00 | 4200.00 | 4660.00 | 4300.00 | 3010.00 | 3795.00 |
| एकुण: | 5206.61 | 4250.00 | 4200.00 | 4660.00 | 4300.00 | 3010.00 | 3795.00 |
| एकुणांत : | 18806.61 | 4600.01 | 4215.61 | 7190.00 | 4520.00 | 3010.00 | 10857.11 |

उपरोक्त प्रमाणे वर्ष २०१९-२०२० मधील योजनेतंर्गत एकुण **रु.१०८५७.११**/- लक्ष अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी सादर. सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रकासाठी सोबत संलग्न टिपणी जोडून सादर करणेत येत आहे.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.०३** :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०१८-१९ करीता अर्थसंकल्पित झालेला निधी रु.४५.२० कोटी चा निधी राज्य व केंद्र शासना कडुन प्राप्त करुन घेण्यास, तसेच सन २०१९-२० चे अदाज पत्रक रु.१०८.५७ कोटी रक्कमेस सदर सभा मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री. बळवंत मारुती गेडाम.

**अनुमोदक** :- मा.श्री. काशीनाथ डाऊ वळवी.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ०४ सन २०१८-१९ वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व लेखापरिक्षक शुल्क निश्चित बाबत.**

सहकार कायदा १९६० च्या ९७ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड एम व महाराष्ट्र शासन अध्यादेश दि.१४.०२.२०१३ ला अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणा शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/३८९/प्र.क्र.५५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई दि.०४.०३.२०१३ अनुसार तसेच सहकार कायदा १९६० चे कलम ७५ (२अ) नुसार "प्रत्येक संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम ८१ मध्ये निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरिक्षकाची किंवा लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थेची चालु वित्तीय वर्षासाठी नेमणुक करायची आहे.

दि.१४/०९/२०१८ रोजी नागपुर येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील ठरावा क्र.३२,

“सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, महामंडळाचे सन २०१८-१९ करीता लेखापरीक्षक नेमण्यासाठी सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था हे जर सहकार विभागाच्या नाम तालिकेत असतिल तर त्यांना महामंडळाचे लेखापरीक्षण करण्या बाबत लेखी पत्राव्दारे विचारना करण्यात यावी. यानंतर पुढील सभेत सदरचा विषय सादर करावा.

**सुचक** :- मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम.

**अनुमोदक** :- मा.श्री.मधुकर निंबाजी काठे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

सदर ठरावा नुसार, सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांना मुख्य कार्यालय, नाशिक च्या जा.क्र.आविम/लेखापारीक्षण/२०१८-१९/४०९०/२०१८ नाशिक



Scanned with CamScanner

दि.२४/०९/२०१८ पत्र ई-मेल व्दारे देण्यात आले. आज दि.२७/०९/२०१८ अखेर पर्यंत सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले नाही.

दि.३०/०९/२०१८ अखेर पर्यंत सदर संवैधनिक लेखापरीक्षकाची नेमणूक होणे सहकार कायदयाने आवश्यक आहे. करीता सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ व क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ मधील अ.क्र. १० मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक चे शुल्क खालील प्रमाणे नमुद आहे.

| Sr. No. | Type of Society | As per new notification | | |
|---|---|---|---|---|
| | | Scale of Fees | | |
| | | Details of Parameters | Amount as per Parameters | Maximum amount limit |
| 10 | Maharashtra State co-operative Tribal Development Corporation Ltd. | Procurement & Processing of per quintle | 0.50 | 2500000 |
| a | For Government Procurement | | 10000 | |
| b | For Service Supply | Per unit | | 20000 |
| c | In liquidation | | | |

उपरोक्त शासन निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांचे दि.०२/०५/२०१६ च्या निकाला नुसार स्थगिती (Stayed) आहे.

महामंडळाचे सन २०१८-१९ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१०/०९/२०१८ पर्यंत खालील प्रमाणे सनदी लेखापाल व सनदी लेखापाल संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | सहकार पॅनल क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | सहकार पॅनल वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १०१४३१२ | बी. आय. डी. एस. अॅण्ड कंपनी, औरंगाबाद. | अ-१ |
| २ | १७८२७ | ए. एस. के. वाय. अॅण्ड कंपनी, पुणे. | अ-१ |
| ३ | १४३५३ | वामु अॅण्ड असोसिएट, पुणे | अ-१ |
| ४ | १८०८९५ | एन. एस. एम. अॅण्ड कंपनी., नाशिक | ब-१ |
| ५ | - | मुळे येवलेकर अॅण्ड असोसिएट, मुंबई. | (सहकार पॅनलवर नोंद नाही.) |

उपरोक्त तपशिला प्रमाणे सदर संस्था हया सन २०१८-१९ संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता इच्छुक आहे याबाबत तपशिल खालिल प्रमाणे.

१ अनुक्रमांक ३ मधील सहकार पॅनल क्र.१४३५३ वामु अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांनी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ चे नेमणुक करणे करण्यात आलेली आहे. "दि.२९/१०/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र.२(२) एक लेखापरीक्षक एकाच संस्थेचे सलग तीन वर्षापेक्षा जास्त मुदती साठी लेखापरीक्षण करु शकत नाही." त्यामुळेवामु अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांची नेमणुक करता येणार नाही.

Scanned with CamScanner

C641

२ अ.क्र.४ सहकार पॅनल क्र.१८०८९५ एन.एस.एम. ॲण्ड कंपनी., सनदी लेखापाल, नाशिक यांचे सहकार पॅनल मधिल वर्गवारी ब-१ मध्ये येते. त्यामुळे एन.एस.एम. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची नेमणुक करता येणार नाही.

३ अक्र.५ मुळे येवलेकर ॲण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, मुंबई हे सहकार पॅनल वर नाहीत. त्यामुळे मुळे येवलेकर ॲण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, मुंबई यांची नेमणुक करता येणार नाही.

४ अक्र.१ सहकार पॅनल क्र. १०१४३१२ बी. आय. डी. एस. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, औरंगाबाद सहकार पॅनल वर्ग अ-१ व
अक्र.२ सहकार पॅनल क्र.१७८२७ ए.एस.के.वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे. सहकार पॅनल वर्ग अ-१ समावेश आहे.

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र.३ व ४ नुसार यांचे बी. आय. डी. एस. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, औरंगाबाद व ए.एस.के.वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे अर्जानुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.०४** :- सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नियमा नुसार लेखापरीक्षण फी निश्चित करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. मारुतीराव लक्ष्मण खंडारे.
**अनुमोदक** :- मा.श्री. भास्कर मोतीराम कोसरे.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.०५ : सन २०१६-१७ चे संवैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकृत करणे बाबत.**

केंद्र शासनाने केलेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड. एम नुसार व राज्य शासनाचे अध्यादेश दि.१४/०२/२०१३ अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणानुसार महामंडळाचे सहकार कायद्यान्वये बंधनकारक असलेले संवैधानिक लेखापरिक्षण सहकार आयुक्त यांच्या नामतालिकेवरील "अ" सुचित समाविष्ठ असणारे सनदी लेखापाल वामु व असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांची सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.२८.०९.२०१६ च्या संचालक मंडळ सभा ठराव क्र.५ व दि.२९.०९.२०१६ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव क्र.७ पारीत करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने व मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आविम/लेखा-२/लेखापरिक्षण/४८७/२०१७ नाशिक दि.१५.०५.२०१७ अन्वये नेमणुक करण्यात आली होती.

क्रमाक ६ अन्वये दिनांक २० .... .

वामु व असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांचे दि.०७/०९/२०१८ चे पत्रानुसार दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल मुख्य कार्यालास दि.१०/०९/२०१८ रोजी प्राप्त झाला आहे.

सन २०१६-१७ सदर वर्षात महामंडळास "ब" वर्ग मिळाला आहे. प्राप्त लेखापरिक्षण अहवालाच्या गोषवाऱ्यातील मुद्यास मान्यता मिळावी.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ०५** :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०१६-१७ चे सवैधनिक लेखापरीक्षक मे.वामु ॲण्ड असोसिएट, सनदी लेखापाल पुणे यांचे कडुन लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालातील अनियमितता व अक्षेप / हरकरती बाबत प्रशासनाने नियम संगत कार्यवाही करावी, याबाबीस अधिन राहुन लेखापरीक्षण अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

त्याचा दोष दुरुस्ती अहवाल विहीत "ओ" नमुण्यात व विहीत कालावधीत पुर्ण करुन संचालक मंडळाच्या मान्यतेने सादर करण्यात यावा. करता सदर सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** :- मा.श्री. विलास पांडुरंग बांडे.

**अनुमोदक** :- मा.श्री. देवानंद नारायण मसराम.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषयसुची नुसार विषयावार सांगोपाग चर्चा झालेनंतर मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय (आ.वि.) यांनी संस्था प्रतिनिधी यांना आपले मनोगत व्यक्त करण्यास सुचित केले. त्यानुसार खालील प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले.

**श्री दिपचंद राजाराम कोकणी, ब्राम्हणवेल आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., ब्राम्हणवेल, जि. नंदुरबार :-** आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ९३० आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था हया महामंडळाच्या भागधारक आहेत. महामंडळाकडून ज्या योजना राबविल्या जातात त्यांचा संस्थाना फायदा होत नाही. सन २०१३-१४ पासून खावटी कर्ज वाटप होत नाही, शासनाला योग्य प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे संस्था हया डबगाईस आलेल्या आहेत. गेल्या चार वर्षापासून संस्थाना कमिशन मिळालेले नाही. नोटबंदीमुळे प्रशासन खाली गेले, व्यापारी यांनी आदिवासी कास्तकारांना देशोधडीला लावले, आदिवासी कास्तकारांना त्यांच्या धानाचा मोबदला वेळेत भेटत नाही. एकाधिकार खरेदी योजना पुन्हा जोमाने सुरु करुन आदिवासी बांधवानां त्यांचे हातात पैसे दया, कारण ऑनलाईन पैसे खात्यावर जमा होण्यास विलंब होत असल्याने आदिवासी कास्तकाराची जनमानसात कुचंबना होत आहे, प्रशासन हे बघ्याची भुमिका घेत असुन यावर उपाय करीत नाही. मुख्य कार्यालय, नाशिक पातळीवरील प्रशासन काय कारत आहे हे आम्हाला कळेनासे झाले आहे.

महामंडळाचे ४३ चे सभेचे ९७ घटना दुरुस्ती मान्य नसल्याचे संस्थास प्रतिनिधींनी सांगितले, महामंडळाचे ऑडिटराची नियुक्ती करावी, घट-तुटी माफी बाबत शासनास वेळोवेळी प्रस्ताव सादर करावा तसेच खावटी कर्ज / शबरी लाभार्थीचे थकित रक्कमा बाबत शासनास प्रस्ताव

Scanned with CamScanner

C639

सादर करावा ज्या प्रमाणे शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले त्याच धर्तीवर खावटी कर्ज/ शबरी थकित लाभार्थ्यांचे कर्ज माफी बाबत शासनास प्रस्ताव सादर करावा. तसेच संस्था खरेदी करीत असलेल्या ठिकाणी धानाचे साठवणुकी अभावी नुकसान होऊ नये यादृष्टी ओटे बांधणे आवश्यक आहे त्यासाठी २ लाख निधी मंजुरीस उपस्थित संस्था प्रतिनिधीची सभेपुढे विनिंती केली. तसेच नविन गोदाम बांधणेची प्रक्रिया लवकरात लवकर करावी जेणे करुन घटीचे प्रमाणावर नियंत्रण ठेवता येईल.

**श्री.देवराम भिवा मरसकोल्हे, कोहमारा/सडक अर्जूनी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. जि. भंडारा :-** यांनी आपल्या अडअडचणी सभेपुढे मांडतांना सांगितले की सन २०१६-२०१७ चे संस्था कमिशन अद्याप आम्हाला दिलेले नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे संस्था हया आर्थिक अडचणीत आलेल्या आहेत. यावर महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, महामंडळामार्फत खरेदीची प्रक्रिया हि अतिदुर्गम भागात राबवतो, वरीष्ठ पातळीवरुन वाहतुकी बाबत निर्णय झालेला नाही. अन्न, नागरी व पुरवठा संरक्षण विभाग यांचे अहवालानुसार माल वेळेत उचल होत नाही त्यामुळे घटीचे प्रमाणात वाढ होत आहे. सदर घट-तुट मंजुरीस अद्याप मंजुरी मिळाली नसल्याने घट-तुट वसुलपात्र संस्थाना त्यांच्या कमिशनच्या रकमा हया देण्यात आलेल्या नाहीत. F.C.I व महामंडळ यांच्या ढिसाल कारभारामुळे संस्था हया डबघाईस आलेल्या आहेत.

घटनेचा आदर करुन पुढील सभा चालवावी व मोजक्याच शब्दात मत माडावे असे मा. मंत्री यांनी उपस्थित संस्था प्रतिनिधीना सुचना दिल्यात व पुढील सभा पुन्हा सुरु करणेस परवानगी दिली.

**श्री शंकरलाल गुणेजी मडावी, दरेकसा, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.जि.भंडारा :-** भंडारा व अहेरी अंतर्गत कार्यरत सभासदांना अहवाल हे २७ तारखेला प्राप्त झाले. त्यामुळे अहवालाचा निट अभ्यास करता आला नाही. तरी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या किमान ८ दिवस अगोदर वार्षिक अहवाल मिळावा. संस्थाना वेळेवर त्यांच्या देय रकमा दिल्याजात नाहीत. ९.३३ घटनेच्या नियमानुसार प्रस्ताव सादर करावे. खरेदीसाठी संस्थाना बारदाना दिला जात नाही.

भंडारा अंतर्गत कार्यरत संस्थाना दिलेल्या कमिशन रकमा व शासन स्तरावर घट-तुट माफी बाबत सादर केलेल्या प्रस्तावा बाबत महाव्यवस्थापक (विपणन) यांचे स्वागत केले. ४५ व्या वार्षिक आमसभेत संस्थेचा ताळमेळ घेतलेलानाही. महामंडळ हे आदिवासी उपयोजना क्षेत्रात अभिकर्ता म्हणुन काम करत आहे. संचालक मंडळ यांची कशासाठी नियुक्ती केली, संचालक मंडळ हे महामंडळाचे कामकाजाकडे लक्ष देत नाहीत व संस्थाचे प्रश्न सोडवत नाहीत. २% घट ही मंजुर झालीच पाहिजे. संस्था पातळीवर खरेदी झालेला माल २ महिन्यात उचल झाल्यास आम्ही संस्था पातळीवर घटीचे प्रमाण कमी येईल. माल उशिरा उचल झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार. शासनाला जो घटी बाबत जो प्रस्ताव सादर केला आहे त्याची प्रत आम्हाला मिळाली पाहिजे असे सुचित केले. माल २ महिन्यात उचल केल्यास घटीचे प्रमाण ०% राहिल. मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी जबाबदारी घेवून कार्यप्रणाली तयार करुन अंमलबजावणी करावी. सन २०१५-१६



Scanned with CamScanner

मध्ये खरेदी केली नाही वरील मागण्या त्वरीत पुर्तता मंजूरी साठी संस्था प्रतिनिधी सभात्याग करणेसाठी उभे राहिले.

मा. मंत्री यांनी संस्था प्रतिनिधीना आश्वासन दिले की, सर्व मुद्यांची पुर्तता शासनाकडे सादर करण्यांत येईल व पुढील सभा चालु ठेवणे बाबत संस्था सदस्यांना स्थानापन्न होण्याचे सुचित केले.

सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये संस्था पातळीवर खरीदलेला माल उशिरा उचल झाल्याने घट-तुटीचे प्रमाणात वाढ आली आहे. असहकार्यामुळे घटीचे प्रमाण वाढत आहे. खरेदीसाठी नविन बारदाना न मिळाल्याने खरेदी बंद आहे. मागिल हंगामात एकदा वापरलेला जुना बारदाना खरेदी करुन पुरवठा केला गेला आहे. नविन बारदाना खरेदी केला रु. ५५.०० प्रमाणे, ३५ लाख कास्तकारांकडून बादराना खरेदी केला रु. १०/- ते रु. १५/- केला. केंद्रावर धान खरेदी आल्यास कास्तकारांना त्यांचे बारदानाला रु. १८/- ते रु. २०/- दर दयावा. त्यामुळे शासनाचे (महामंडळाचे) २१ करोड वाचतील याबाबत संचालक हे संस्था प्रतिनिधीची बाजु प्रशासनाकडे मांडत नाहीत. आमच्या सुचनांची अंमलबजावणी करावी. संचालक मंडळात ३ विधायक शासन नियुक्त प्रतिनिधी नाहीत. महामंडळाचे करारनामे हे नेहमी महामंडळाचे बाजुनेच असतात हयाचा परिस्थितीजन्य अभ्यास करावा. घटीस पात्र संस्थावर FIR दाखल करावा. महामंडळ कोण चालवत आहे. सन २०१५-१६ चे ८०% कमिशन आम्हाला मिळाले. शासकीय प्रतिनिधी आमचे प्रश्न ऐकून घेत नाहीत. २१ करोड शिल्लक खराब बारदाना व सन २०१४-१५ चा सडलेला भात याकडे माल उचल बाबत महामंडळाने लक्ष दिले नाही, अधिकारी काय करतात, महामंडळाच्या व्यवस्थापन खर्चावर नियंत्रण नाही अधिकारी वर्ग मनमानी प्रमाणे खर्च करीत आहेत. सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ चे कमिशन आम्हाला मिळाले नाही, आम्हाला कमिशन मिळालेच पाहिजे कमिशन न देण्यास महामंडळच जबाबदार आहे. कमिशन ने मिळाल्यास खरीप पणन हंगाम २०१८-१९ मध्ये संस्थे मार्फत खरेदी केली जाणार नाही व खरेदीवर पूर्णतः बहिष्कार टाकणेत येईल अशा सुचना सभेपुढे देण्यात आल्यात.

**श्री.रविंद्र कन्हैयालाल नवलाखे, टिटंबा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., टिटंबा, ता.धारणी, जि. अमरावती :-** प्रादेशिक कार्यालय, धारणी अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये खरेदी केलेली तुर ९०००.०० क्विंट अद्याप शिल्लक असुन सडलेल्या परिस्थितीत आहे. रु.८०००.०० (अक्षरी रक्कम रुपये आठ हजार मात्र) पर्यत विक्री दर प्राप्त होऊन देखिल प्रादेशिक व्यवस्थापक यांनी परिस्थितीजन्य न घेतल्यामुळे आज मितीस रक्कम रुपये ५०.०० (अक्षरी रक्कम रुपये पन्नास लक्ष मात्र) लाख महामंडळास नुकसान भोगावे लागेल याला जबाबदार कोण ? परिस्थितीजन्य निर्णय घेऊन वसुलीची कार्यवाही करावी.

**श्री.हरिचंद्र पांडुरंग कोहळे, परसोडी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., परसोडी, ता.देवरी जि.गोंदिया :-** हंगाम २०१७ ते २०१८ चे कमिशन मिळाले, संस्था पातळीवर दाखविलेली घट कमी करावी, गोदामभाडे त्वरीत अदा करावे. अद्याप बारदाना रकमा प्राप्त नाही. निधी देतांना महामंडळाचे अधिकारी जाणूनबुजून भेदभाव केला आहे. महामंडळात आर्थिक पादर्शकता नाही. सन २०१८-१९ करीत खरेदी करण्यांस संस्था तयार नाहीत. आर्थिक अडचणीमुळे संस्था डबघाईस आलेल्या आहेत. शासनाचे परिपत्रकानुसार संस्था कमिशन त्वरीत



Scanned with CamScanner

C 637

अदा करावे. गोदामे बांधने करीता महामंडळाने संस्थेस आर्थिक मदत करावी. संस्थेची वसुली होणेसाठी ऑनलाईन पेमेंटमध्ये वसुली रकमा वसुल करुन कास्तकारांच्या खात्यावर रकमा वर्ग कराव्यात.

**श्री माधव नारायणजी तलमले, वडेगाव आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., वडेगाव ता. कुरखेडा जि.गडचिरोली :-** शासनाकडून विविध योजना राबविणेसाठी १००% अनुदान मिळते परंतु महामंडळाकडून पुरेसा निधी प्राप्त होत नाही. रक्कम रुपये ०१.०० (अक्षरी रक्कम रुपये एक मात्र) प्रमाणे गोदामभाडे प्रलंबित प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयात प्रलंबीत आहेत परंतु वेळीच अदायगी होत नाही. संस्था कमिशन दर ७०% ते ८०% करावेत अशी मागणी सभेपुढे मांडण्यात आली. शेतकऱ्यांना बारदानाची रक्कम उशिरा प्राप्त होते परंतु व्यापाऱ्यांचे पेमेंट वेळेत पूर्ण केले जाते हे कसे ? संस्था पातळीवर शिल्लक परंतु निरुपयोगी बारदानाची रक्कम वसुल करु नयेत. खरेदी बाबत संस्था व महामंडळ यांत केला जाणारा करारनामा हा दोघांनाही बांधुन ठेवेल असा असावा. हंगाम २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीत घटीस संस्था जबाबदार नाहीत कारण माल वेळेच व उशिरा उचल झालेमुळे घटीचे प्रमाणत वाढ झालेली आहे. उप प्रादेशिक कार्यालय, कुरखेडा येथे फक्त १२ कर्मचारी कार्यरत असुन नियमित कर्मचारी नाहीत तरी त्वरीत नियमित सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका कराव्यात. आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. ह्या काय केल्याचे आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील असे उपक्रम महामंडळा मार्फत राबविणेत यावेत.

**श्री.सुकदेवराम सदाशिव धुर्वे,बागदापुर आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., बागदापुर, ता.कारंजा, जि.वर्धा :-** संस्थकडे आर्थिक पाटबळ नसल्याने सचिवाचे पगार २०१४ पासून झाले नाही, संस्थाना व्यवसाय करणेसाठी काही योजना संस्थेस राबविणेसाठी दयाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

**श्री.सखाराम डोमा तुमसरे, मंगेझरी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., मंगेझरी, ता.तिरोडा,जि.गोंदिया :-** तिरोडा या संस्थेने बिगर आदिवासी क्षेत्रातील संस्थांना महामंडळाने खरेदी केंद्र द्यावे. तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील ज्या संस्था धान खरेदी करण्यास तयार आहेत अशा संस्थांना धान खरेदी केंद्र मंजुर करावेत.

**मा.संचालक मंडळाचे वतीने खालील सन्माननीय संचालक सदस्य यांनी मनोगत व्यक्त केले.**

**मा. श्री मधुकर निंबाजी काठे, संचालक, (आ.वि.म.) :-** काही अपरीहार्य कारणास्तव मा.संचालक श्री अशोक भाऊराव मंगाम यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेवर बहिष्कार टाकल्याने ते व्यासपीठावर उपस्थित मान्यवरासमवेत स्थानापन्न झाले नव्हेते. तेव्हा मा.संचालक यांचा मंहामंडळाच्या संस्थांना त्यांचा सर्वाचा पाठींबा असल्याचे सांगितले, तसेच महामंडळ हे व्यापारी तत्वावर कसे चांगले कार्य करता येईल हे पहावे. संस्थाचे देणे लवकरात लवकर अदा करावेत.

तसेच महामंडळाचे कामकाज कसे चालते निर्णायक कामकाज कसे होते याबावत मा. राज्यमंत्र्यांना याबाबत काही कळविले जात नाही. महत्वाचे विषयावर निर्णय घेणेबाबत कार्यालयीन फाईची परस्पर मा. अध्यक्ष तथा मंत्री यांचेकडे पाठविल्या जातात. यापुढे महामंडळाचे कामकाजाच्या महत्वाच्या फाईचे मा.राज्य मंत्र्यांच्या मार्फत गेल्या पाहिजेत असा ठराव घेण्याबाबत मा. श्री काठे संचालक यांनी सुचना दिल्यात त्यास सर्व संचालक व उपस्थित संस्था सदस्यांनी सहमती दर्शविली.

वरील विषयावर सांगोपाग चर्चाहोऊन खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत करण्यात आला.



Scanned with CamScanner

क्रमांक ६ अन्वये दिनांक --

**आयत्या वेळेचा ठराव क्रामांक १** :- बहुमताने ठराव मंजुर करण्यात येतो की, दिनांक २९.०९.२०१८ रोजी सन २०१७-१८ च्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव मंजुर करणेत येतो की, यापुढे निर्णायक फाईली अथवा महत्वाचे विषयावर मा. राज्यमंत्र्यांचा अभिप्राय घेऊनच मा. अध्यक्ष तथा मा.मंत्री (आ.वि.म.) यांचेकडे पुढील मंजुरीसाठी/ स्वाक्षरी करीता सादर कराव्यात.

**सुचक** :- श्री मधुकर निंबाजी काठे, संचालक

**अनुमोदक** :- श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालिका.

**ठराव बहुमताने मंजुर**

**मा. श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक, (आ.वि.म.) :- मा. मत्री तथा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे विदर्भात** सन २०१७-१८ च्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेतल्याबद्दल आभार मानले भंडार, गोंदिया, चंद्रपुर जिल्हयात आधारभुत किंमत खरेदी योजना चालु आहे. ही शासनाची योजना असल्याने ती यशस्वीरित्या पार पाडित आहोत. संचालक मंडळ, संस्था प्रतिनिधी बरोबर सन २००९-१० ते २०११-१२ चे घटी बाबत संस्था जबाबदार नाहीत. महामंडळाचे नियोजना अभावी आलेल्या घटीस महामंडळाचे अधिकारी/कर्मचारीच जबाबदार आहेत. खरेदी कमिशन मध्ये वाढ करावी. ५/- प्रतवारी प्रमाणे होणारी रक्कम संबधीत संस्थाना लवकरात दिली जाईल.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री, आदिवासी विकास (म.रा.) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक :-** ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित सर्व मान्यवरांचे व सर्व संचालक , माजी संचालक व्यवस्थापकीय संचालक, उपस्थित अधिकारी व सर्व संस्था प्रतिनिधीचे स्वागत करुन वार्षिक सर्वसाधारण सभेत संबोधित करतांना सुचित केले की, गेल्या अनेक वर्षापासुन चर्चेनुसार आदिवासी विविध कार्यकारी संस्था हया सक्षम झाल्या पाहिजेत, त्यांच्या समस्या दुर होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न राहिल अशी ग्वाही त्यांनी संचालक मंडळाचे वतीने तसेच शासनाचे वतीने दिली.

यापुढे सर्व संस्थांना वार्षिक अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ०८ (आठ) दिवस अगोदर मिळेल याची खबरदारी घेण्यात येईल, असे सांगुन तसे महामंडळाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील.

मा.संचालक श्री दुधनाग यांनी सांगितल्या प्रमाणे रु.५.०० (अक्षरी रक्कम रुपये पाच मात्र) ग्रेडिंगची रक्कम लवकरात लवकर संबधीत संस्थाना देण्याची कार्यवाही देण्यात येईल. उपस्थित सभासदांनी उपस्थित केलेले मुद्दे व मांडलेले विषय, संस्थांच्या अडचणीवर भर देवून, आर्थिक अडचणी दुर करणेवर अधिक भर दिला जाईल. महामंडळ हि शासनाची एजन्सी असल्याने ती कशी चालवली जाईल याबाबत मिटींग घेवून कार्यवाही केली जाईल. तसेच संस्थेचे कमिशनमध्ये वाढ झाली पाहिजे याबाबत आम्ही प्रयत्नशील आहोत.

सभेत मांडलेले प्रश्न कसे सोडविता येतील याबाबत प्रयत्न केले जातील. संस्था सभासदांना अडचणी येणार नाही. खावटी कर्ज वाटप योजना पून्हा सुरु करणेत येईल परंतु मागील थकबाकी जास्त असल्याने वाटप होऊशकत नाही. एकूण ३०० कोटी कर्ज माफ करणे आवश्यक आहे. सदर कर्ज माफ झाल्यास खावटी कर्ज वाटप योजना पुन्हा करणेत येईल याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणे सुरु आहे. महामंडळाचा कारभार हा पारदर्शक झाला पाहिजे. मांडलेल्या सुचनांचे गांभिर्याने विचार होऊन महामंडळाचे काम व्यवस्थित झालेल याची दखल सर्वानुमते घेण्यात यावी.



Scanned with CamScanner

C635

त्यानुसार महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी आभार प्रदर्शन करतांना, आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित मा.अध्यक्ष, सन्माननीय संचालक तसेच अधिकारी/कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानुन मा.अध्यक्ष महोदय यांचे वतीने आजच्या सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

बाबासाहेब गायकवाड, टंकलिपिक     गणेश जाधव, कनिष्ठ सहाय्यक

प्रतिक चौधरी, उपव्यवस्थापक     संदिप पाटील, लेखापाल

व्यवस्थापक (प्रशासन)  व्यवस्थापक (विपणन)  व्यवस्थापक (लेखा १)  व्यवस्थापक (लेखा २)  व्य.लेखा-3

महाव्यवस्थापक (प्रशासन)  महाव्यवस्थापक (विपणन)  महाव्यवस्थापक (वित्त)

व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक

मा.अध्यक्ष,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक

Scanned with CamScanner